१०

# निर्णयाचा क्षण

डॉ. साधल्यांच्या घरचा फोन आलाय असं जेव्हा हिनं सांगितलं तेव्हा हातातलं पुस्तक बाजूला ठेवून मी फोन घेण्यासाठी माझ्या रीडिंगरूममधून बाहेर पडून दिवाणखान्यांतील फोनचा रिसीव्हर कानाला लावला.

'हॅलो... हॅलो... मी डॉ. तांबे बोलतोय... कोण वहिनी का? का हो असा उशीरा फोन केलात्...? काही काम आहे कां?'

पलीकडून वहिनींचा-सौ. साधल्यांचा आवाज आला.

'बापू, आज जरा यांची तब्येत मला ठीक वाटत नाही. तुम्ही जरा थोडा वेळ येऊन जाल का?'

'हो... हो... जरूर येतो आम्ही दोघं दहा-पंधरा मिनिटांत! पण वहिनी श्रीधरला अचानक काय झालं? संध्याकाळी मी तुम्हाला त्याला व्हिलचेअर मधून नेताना पाहिलं होतं. तेव्हा तर तो मला बरा दिसला.'

'अहो बापू, संध्याकाळी हे बरे होते. जेवले पण थोडंसं! पण आताच त्यांना उलटी झाली आणि धाप लागली आहे. तुम्ही लवकर आलात तर बरं होईल.'

'हो... हो... निघालोच आम्ही.'

मी फोन खाली ठेवला.

गराजमधून गाडी काढून आम्ही दोघं रेगोपार्कमधल्या साधल्यांच्या घरी पोचलो. रात्रीचे साडेनऊ वाजले होते. नोव्हेंबरची थंडी सुरू झाली होती न्यूयॉर्कला. दिवस लहान-लहान होत चालले होते आणि रात्री मोठ्या. बाहेर काळाकुट्ट अंधार दबून बसलेल्या काळ्या बोक्यासारखा गुरफटून गेलेला दिसला.

दारावरची बेल दाबली. वहिनींनीच दार उघडले.

'या! या! मी तुमची अगदी चातकासारखी वाट पाहून राहिलेय्. वसुमती, तू आलीस... खूप बरं वाटलं मला एकटीला... ये... अशी आत ये.'

किचनच्या बाजूला लागून त्यांची बेडरूम होती. आम्ही तिघे बेडरूममध्ये शिरलो. मोठा पलंग खोलीच्या मध्यभागी होता. एका बाजूच्या साईड टेबलावर बेड लॅम्प होता आणि दुसऱ्या बाजूच्या टेबलावर औषधांच्या बाटल्या होत्या. अस्ताव्यस्त होऊन पडलेला श्रीधर पलंगाच्या डाव्या बाजूला पांघरूण घेऊन झोपला होता. त्याचा उजवा हात पलंगाच्या एका बाजूला लोंबकळत होता. आमच्या येण्याची चाहूल श्रीधरला लागली नसावी.

'अहो... ऐकलंत का... कोण आलंय बघा आपल्याकडं...!'

श्रीधरनं काही एक हालचाल केली नाही. वहिनी पलंगाच्या पलीकडच्या बाजूला गेल्या आणि त्यांनी दोन्ही हातांनी श्रीधरला उताणा केला.

त्याच्या तोंडातून लाळ वाहात होती. खोल गेलेले डोळे निस्तेज होते. त्याच्या छातीचा भाता वरखाली होत होता. धाप लागलेली स्पष्ट दिसत होती. त्याची ती परिस्थिती पाहून माझ्या मनात अशुभाची पाल चुकचुकली.

मी वहिनींना म्हटलं,

'वहिनी, मला वाटतं याला ताबडतोब हॉस्पिटलमध्ये न्यायला हवं. मी ९११ला फोन करतो आणि ॲम्ब्युलन्स मागवतो. आताच्या आता आपण त्याला लाँगआयलंड ज्युईश हॉस्पिटलमध्ये दाखल करू या.'

वहिनी काही बोलल्या नाहीत. त्यांच्या डोळ्यांत टचकन पाणी आलं. मागं वळून त्यांनी वसुमतीकडं पाहिलं. तिचंही म्हणणं तेच आहे हे समजून त्या टॉपकोट घालण्यासाठी वळल्या.

मी ९११ला फोन लावला आणि ऑपरेटरला ताबडतोब ॲम्ब्युलन्सची व्यवस्था करण्यास सांगितलं आणि श्रीधरच्या घराचा पत्ता दिला. दहा मिनिटांत ॲम्ब्युलन्स आली आणि श्रीधरला घेऊन हॉस्पिटलला रवाना झाली. माझ्या गाडीतून आम्ही तिघे ॲम्ब्युलन्सच्या पाठोपाठ हॉस्पिटलला पोहोचलो.

प्राथमिक तपासणीनंतर इमर्जन्सी डॉक्टरने श्रीधरला ताबडतोब ICU मध्ये दाखल करून घेतलं. ICU मध्ये कुणालाच जाऊ दिलं नाही. वसुमती आणि वहिनी वेटिंगरूममध्ये बसल्या आणि मी परत ICU खोलीजवळ घोटाळत होतो. इतक्यात दोन डॉक्टर्स घाईघाईने ICU कडे येताना मी पाहिले. त्यातील एक पोरगेलासा, काळा डॉक्टर Intern असावा; ओळखीचा वाटला.

'सिडनी ओ सिडनी' म्हणून शब्द माझ्या तोंडातून बाहेर पडले. त्यानं वळून माझ्याकडं क्षणभर पाहिलं आणि हात हालवून तो दुसऱ्या डॉक्टरच्या मागोमाग ICU मध्ये शिरला.

मी वेटिंगरूमकडे आलो. वहिनी आणि वसुमती चिंताग्रस्त होऊन तिथं बसून होत्या. मी पण जवळच्या एका खुर्चीवर बसलो. श्रीधरची परिस्थिती ICU मध्ये कशी असेल व पुढे काय होणार याची हुरहूर मनाला भयग्रस्त करून टाकत होती. वाट पाहण्याशिवाय गत्यंतर नव्हतं.

* * *

मी आणि श्रीधर दोघेही जवळ-जवळ एकाच वेळी १९६८ साली हिन्दुस्थान सोडून अमेरिकेला आलो. आम्ही दोघेही पुण्याचे... एकाच रस्त्यावर राहणारे दोस्त. त्या वेळी प्रभात रोड एवढा गजबजलेला नव्हता आतासारखा. मी फर्ग्युसनचा विद्यार्थी तर श्रीधर एस. पी. चा. मी गणित विषयात एम. ए. ची पदवी घेतली आणि त्यानं बी. एस्सी. करून पूना मेडिकल कॉलेजला प्रवेश मिळवून एम. बी. बी. एस. केलं आणि उच्च शिक्षणासाठी तो अमेरिकेला आला. मी न्यूयॉर्कमधील एका कॉलेजमध्ये लेक्चरर म्हणून कामाला लागलो आणि श्रीधर एम. डी. चा अभ्यास आणि बोर्डाच्या परीक्षा देण्यात गुंतला.

तीन एक वर्षांनी श्रीधर अभ्यास संपवून आणि डॉक्टरकीचं लायसन्स मिळवून परत पुण्याला गेला आणि लग्न करून परत आला. त्याची पत्नी, पूर्वाश्रमीची वीणा श्रीखंडे - अर्थशास्त्राची एम. ए. होती. दोघांचा जोडा दृष्ट लागण्यासारखा होता. श्रीधरनं पहिली नोकरी क्विन्स हॉस्पिटलमध्ये घेतली. आठ-दहा वर्षांनंतर त्यानंतर त्यानं स्वतःची फॅमिली प्रॅक्टिस सुरू केली. दरम्यान माझंही लग्न झालं आणि गणित विषयात पी. एच. डी. केल्यानंतर, मला कोलंबियामध्ये प्राध्यापकाची नोकरी मिळाली. आमच्या दोघांचेही संसार फुलत होते. मला दोन मुली होत्या आणि श्रीधरला एक मुलगा अनिकेत आणि एक मुलगी होती. मुलगी अनुराधा जरा लहान होती. दोन मुलात जवळ-जवळ सहा-सात वर्षाचं अंतर होतं. आमचं जाणं-येणं आणि मैत्री कायम होती.

मुलं मोठी होत होती. माझ्या मोठ्या मुलीनं - रेखानं, प्रवीण कांबळी याच्याशी लग्न जमवलं आणि धाकटीनं कॉलेजमधल्या एका ज्यू माणसाशी! आम्ही दोघांनी कसलाही विरोध न करता पोरींची लग्नं करून दिली. दोन्ही जावई चांगले शिकलेले आणि आपापल्या व्यवसायात स्थिर झालेले होते. गेली तीस वर्षं अमेरिकेत राहिल्यानंतर जातीपातीचा विचार करणं शहाणपणाचं नाही एवढ्यावर आम्ही समाधान मानले.

श्रीधरच्या मोठ्या मुलानं M. B. A. केलं आणि काही दिवस वॉलस्ट्रीटवर नोकरी करून तो कॅलिफोर्नियाला मोठ्या कंपनीत नोकरीला गेला.

तिथं त्यानं एका अमेरिकन मुलीशी लग्न करून संसार थाटला. त्यालाही आता किती वर्षं झाली असतील काही सांगता येत नाही.

विचारांच्या तंद्रीत बापूंचा केव्हा डोळा लागला ते कळलं नाही. टेलीफोनच्या खणखणण्यामुळे ते दचकून जागे झाले आणि त्यांनी रिसिव्हर उचलला. पलीकडून आवाज आला.

'हॅलो बापू, काय करतो आहेस तू आता?'

शनिवारचा दिवस असल्यामुळे मी घरीच होतो.

'काही नाही... बसलोय वाचत बिझिनेस विकली...' मी उतरलो.

'आत्ताचे आत्ता माझ्याकडे ये. मला काही फार महत्त्वाचं बोलायचं आहे तुझ्याशी... सल्ला हवाय्. वहिनीला पण बरोबर घेऊन ये.'

...काय बरं याचं काम असावं? आणि अगदी तातडीनं या म्हणतोय म्हणजे तसंच महत्त्वाचं काम असणार!

मी वसुमतीला हाक मारली.

'बरं का वसू, आपल्याला श्रीधरनं तातडीनं बोलावलंय. काहीतरी अर्जंट काम निघालंय. तू साडी बदल आणि चल चटकन. आपण जाऊन येऊ या.'

हिनं साडी बदलली आणि आम्ही दोघे श्रीधरकडे गेलो. तिथं आमच्या आधी डॉ. हर्डीकर आणि त्यांची पत्नी वासंती येऊन बसलेले होते. सर्वांचे चेहरे जरा गंभीर दिसत होते. कळेना काय झालंय ते!

मीच सुरुवात केली.

'काय रे श्री, काय चाललंय? कुणी आजारी बिजारी आहे का?'

'तसं नाही रे बापू. कुणी आजारी वगैरे काही नाही. जरा खाजगी सल्ला हवाय तुम्हा दोघांकडून... कौटुंबिक विषयांत...!'

'अरे, पण बोल ना मग...'

श्रीधरनं क्षणभर वसुधाकडे दृष्टी टाकली आणि बोलायला सुरवात केली.

'त्याचं असं आहे बापू. तुला आमची लेक... अनुराधा ठाऊक आहे. ती यंदा एन. वाय. यू. मध्ये दुसऱ्या वर्षाला आहे.

'हो हो अनू कुणाला माहीत नाही! किती हुषार आहे तुझी मुलगी! बारावीला तिला A+ ग्रेड मिळाली. आता या वर्षी ती Dean List वर आहे असं मला कळलंय...'

'हो रे बाबा, ती आहे डीन लिस्टवर. ती हुषार आहे हेही मला मान्य. तो प्रश्न नाही. तिनं आता आम्हा दोघांना बुचकळ्यात टाकलंय.'

'काय झालं बुवा? काय केलं पोरीनं?'

'कुठून या अमेरिकेत आलो असं मला वाटतंय. पुण्यात होतो ते बरे होतो, असं आता वाटायला लागलंय...!' वहिनींनी सुस्कारा टाकला.

'अहो वहिनी, आता त्याला फार उशीर झाला आहे. उगाच कशाला त्या पुण्याच्या आठवणी काढता आहात? काऽऽही चूक केली नाही इथं येण्यात! अहो संसारात अशा अडचणी येणारच! पण आता सांगा... अनूनं असं काय केलंय की तुम्हा दोघांची झोप उडालीय?'

इतका वेळ डॉ. हर्डीकर गप्प बसून होते. ते म्हणाले,

'बापू, मला श्रीधरनी थोडी कल्पना दिली आहे. पण तुम्ही आमच्यापेक्षा वयानं मोठे आणि दोन्ही मुलींच्या लग्नातून मोकळे झालेले आहात. त्यामुळे तुमचा सल्ला जास्त महत्त्वाचा.'

डॉ. हर्डीकरांच्या बोलण्यावरून माझ्या डोक्यांत प्रकाश पडला. अनुच्या लग्नाबद्दल काही तरी भानगड असावी. अनू आता वीस वर्षांची होती... मोठी होती.

'बापू, मी सांगते तुम्हाला.' वसुधावहिनी बोलायला लागल्या. 'त्याचं असं झालं. मागच्या शुक्रवारी अनू माझ्याकडं आली आणि लाडालाडानं मला म्हणाली, 'ममी, माझा एक मित्र डॅरल जॅक्सन घरी येणार आहे. चालेल नां? मी म्हटलं, 'अगं तुझ्या डॅडींना विचारलंस कां?' त्यावर ती म्हणाली, 'त्यात डॅडीना काय विचारायचं? ममी, डॅरल आमच्या कॉलेजमध्ये लेक्चरर म्हणून गेल्या वर्षी आला. इकॉनामिक्स शिकवायला. खूप छान आहे... उंच... धिप्पाड... कॉलेजात असताना तो बास्केट बॉल टिमचा कॅप्टन होता. माझी त्याची ओळख क्लासमध्ये झाली. आणू ना त्याला घरी तुमची ओळख करून द्यायला?' मी म्हटलं, 'आण बाई... कोण डॅरल कां फॅरल आहे त्याला घरी. मी ह्यांना सांगून ठेवते की जरा हॉस्पिटलमधून लवकर या म्हणून.'

'दोन दिवसांनी रविवार होता. सकाळपासून अनुराधा घरात आवराआवर करत होती. लिव्हिंगरूममधल्या सोफ्यावरचे अभ्रे तिनं बदलले. स्वतःची खोली साफ केली. पुस्तकं आवरली. कपड्यांचा मोठा ढीग वॉशिंग मशीनमध्ये लावला. आज लेक कामाला स्वतःहून लागली हे पाहून मला आश्चर्याबरोबर कौतुकपण वाटत होतं. बरोबर दहा वाजता घराची बेल वाजली. हे उठून दरवाजा उघडण्यास गेले. बाहेर सव्वासहा फूट उंचीचा एक धिप्पाड काळा माणूस उभा होता.

"Yes... whom do you want please?"

"Good Morning Sir...!"

"Good Morning... What do you want?"

"Is it not Dr. Sadhale's house?"

"Yes... Yes. This is Sadhale's house... I am Dr. Sadhale. Please whom do you want?... Please?"

"Sir, I have been invited by your daughter Miss. Anu to meet you and Mumy."

"Oh... that means you are that Daryel Jackson. Aunradha told us about you last Friday."

"Yes Sir, I am Daryel Jackson, her teacher in the college."

"Yes... Yes we know all that, please do come in."

डॉ. साधले बाजूला झाले आणि त्यांच्या मागेच मी उभी होते. मागच्या मागे मी किचनमध्ये शिरले. त्या निग्रो माणसाला पाहून मी अवाक् झाले. मला अंदाज आला. माझी मुलगी... माझ्या रक्तमांसांची...माझी मुलगी, एका काळ्या माणसाच्या प्रेमात पडेल हे मी स्वप्नातसुद्धा खरं मानलं नसतं. बापू, या देशात येऊन आम्हाला जवळ-जवळ तीस वर्षे झाली. या देशाचा इतिहास आणि रीतिरिवाज जवळून पाहिले. मिश्रविवाह पण पाहिले. आपल्या समाजातल्या मुला-मुलींनी गोऱ्या अमेरिकन मुला-मुलींशी लग्न केलेली पण पाहिलीत. डिव्होर्सेसपण पाहिलेत भरपूर. पण माझी मुलगी एका काळ्याच्या प्रेमात पडेल हे मला खरं वाटत नाही!'

मी क्षणभर वहिनींच्या रडवलेल्या चेहऱ्याकडे पाहिलं. मला खूप वाईट वाटलं. एका आईच्या हृदयात चाललेला कल्लोळ मी जाणू शकत होतो.

मी शांतपणे म्हणालो,

'वहिनी, मग काय ठरवलंय तुम्ही दोघांनी?'

'डोंबलाचं! आम्ही काय ठरवणार? म्हणून तर तुमचा सल्ला घ्यायला तुम्हाला बोलावलंय.'

'वहिनी, हे पाहा, आता जमाना बदललाय. तुम्हाला इथं येऊन तीस वर्षांच्या वर वर्षे झालीत. या तीस वर्षांत हा देश पण बदललाय् खूप! तसंच भारतातसुद्धा खूप बदल झालेत. एक लक्षात घ्या, की तुमची मुलगी जाणती आहे - वयानं आणि विचारानं सुद्धा! तिचं भवितव्य तुम्ही ठरवू शकत नाही. तिचं शिक्षण, तिच्या आवडी-निवडी, तिचा पोषाख, तिची मूल्ये या बदलत्या जगात वेगळी असणं अपरिहार्य आहे. तिला तिचं आयुष्य जगायचं आहे. तिनं

स्वत:चं लग्न कुणाशी करावं हे तिनं ठरवायचं आहे. मी स्वत: या संभ्रमामधून गेलो आहे. आपण ज्या काळात जन्मलो-वाढलो, तो काळ वेगळा होता. ती मूल्यं वेगळी होती!'

'मला मिश्रविवाहाचं तितकं वावडं नाही बापू. पण या कारटीने एक काळाकभिन्न निग्रोच कां निवडावा?'

'म्हणजे तिनं एखादा गोरा निवडला असता तर त्याला तुमची हरकत नव्हती. खरं नां? म्हणजे येथे फक्त रंगाचा प्रश्न आहे, नाही कां?'

'अगदीच तसं आहे असं नाही! त्याचं कुळशील वगैरेचा नको का विचार करायला?'

'अहो वहिनी, सगळ्याच गोऱ्यांचं कुळशील चांगलंचं असतं असं का म्हणायचंय तुम्हाला?'

'तसं नाही हो बापू, पण असं वाटतं की हिनं काळ्यापेक्षा गोरा निवडला असता तर आम्हाला जास्त बरं वाटलं असतं.'

* * *

अनुराधाचा निश्चय पक्का होता. तिनं हट्टानं डॅरलशी लग्न केलं. संसार मांडला. डॅरलचे आई-वडील आणि दोन धाकटी भावंडं न्यूऑरलिन्सला राहात होती. धाकटा भाऊ कॉलेजच्या तिसऱ्या वर्षाला होता आणि बहीण नर्सिंगला होती. वडील एका शाळेत शिक्षक होते. कुटुंब चांगलं सुसंस्कृत आणि धार्मिक होतं.

लग्नानंतर अनुराधानं आपलं शिक्षण पुरं केलं आणि ती न्यूयॉर्कला मॅनहॅटनमध्ये एका बँकेत नोकरी लागली. डॅरलचे Ph. D. पुरे झाल्यावर त्याला कॉलेजनं प्रोफेसर म्हणून बढती दिली.

* * *

आज जवळ-जवळ पंचवीस वर्षाचा काळ लोटला होता. अनुराधाला दोन मुलगे झाले. दोघेही बापासारखेच चांगले धिप्पाड आणि उंच होते. वयाच्या मानानं ते थोराड दिसायचे. एकदा गंमतच झाली. अनुराधा दोन्ही मुलांना घेऊन मुंबईला गेली. दादरला प्लाझा सिनेमाजवळून जात होते तिघे. अनुराधाला काही साड्या घ्यायच्या होत्या. ती शहाडे-आठवलेंच्या दुकानांत शिरली. एक इंडियन बाई दोन काळ्या धटिंगणांना घेऊन, साड्या खरेदीला दुकानांत शिरलेली पाहून शहाडे-आठवल्यांच्या दुकानासमोर ही गर्दी जमा झाली. आठवल्यांनी गर्दी जमलेली पाहून, नाक्यावरच्या हवालदाराला वर्दी दिली. दंडूके घेऊन चार-पाच

पोलीस गर्दी हटवायला लागले.

अनुराधा आणि तिच्या दोन्ही मुलांना त्याची कल्पनाही नव्हती. साड्या घेऊन ती बाहेर आली तो काय? सगळा जमलेला समाज 'जिंदाबाद... जिंदाबाद...' म्हणून आरोळ्या ठोकत होता आणि मग हे तिघे फुटपाथने चालू लागले तर सगळा घोळका त्यांचे मागे जाऊ लागला. अनुराधाला कारण कळेना. तिनं थांबून मागून येणाऱ्या इसमाला विचारलं...

'का हो, ... तुम्ही सर्व लोक आमच्या मागे का लागलात?'

तो इसम म्हणाला, 'अहो बाई, तुम्ही तर चांगल्या मराठी बाई दिसता. पण मग या काळ्यांच्या बरोबर कशाला फिरतां?'

अनुराधाला राग आला. पण करते काय? ती म्हणाली,

'अहो ते दोन माझे मुलगे आहेत.'

'अस्सं... काही थापा मारू नका. कोण विश्वास ठेवणार तुमच्या शब्दावर... आँ...?'

समोरून जाणाऱ्या एका टॅक्सीला तिनं हात केला आणि टॅक्सी थांबताच मुलांना घेऊन तिनं अक्षरशः तिथून पलायन केलं. त्यानंतर परत कधीही भारतात जाण्याचं धाडस तिनं केलं नाही.

* * *

मी 'सिडनी... सिडनी...' हाक मारेपर्यंत तो तरुण डॉक्टर श्रीधरच्या खोलीकडे गेलेला मी पाहिला. जाता-जाता सिडनीनं मला हात हालवून 'हॅलो' केलेलं मी पाहिलं होतं.

सिडनी - अनुराधाचा मोठा मुलगा डॉक्टर होऊन या हॉस्पिटलमध्ये रेसिडन्सी करत होता. आज तो ड्युटीवर असणं हा योगायोग होता.

रात्रीचे बारा वाजून गेले. अद्याप ICU मधून काही बातमी कळली नव्हती. वहिनी बसल्या जागी डुलक्या घेत होत्या. वसुमती भकासपणे खिडकीबाहेर पाहात होती. ICU मधून नर्सेसची धावपळ चालू असल्याची चाहूल मला लागत होती. उठून ICU कडे जावं असं अनेकदा मनात आले. पण धीर होत नव्हता.

घड्याळाचा काटा आता एकच्या पुढे सरकला आणि इतक्यात सिडनी ICU मधून घाईघाईनं बाहेर आला आणि त्याची पाऊलं वेटिंगरूमकडे वळली. तो येऊन दारात उभा राहिला आणि त्यानं हाक मारली, "Grand Ma... O Grand Maa..."

वसुधावहिनी खडबडून जागी झाली. समोर उभ्या असलेल्या सिडनीला

पाहून तिच्या तोंडून हुंदका बाहेर पडला. दोन्ही हात पसरून तिनं सिडनीला आपल्या बाहुपाशात घेतलं.

"Grandma... Grandma... listen... Grandpa is conscious now. He has come out of coma. The bleeding in the brain has stopped! Although he is not fully out of woods, he should be O.K. in few days!"

"Oh my God... Sydney... Oh my little Sydney! My Angel!"

तिला पुढे बोलवेना, सिडनीला तिनं आणखीनच जवळ ओढलं. तिच्या डोळ्यांतून घळाघळा पाणी येत होतं...!

■

**– दिवाकर कारखानीस**

**('मन वढाय वढाय' या पुस्तकातून)**